| | |
|---|---|
| एमएचएसओ१७००३४९९२०२० | दाखल तारीख – ०५.१२.२०२०<br>नोंदणी तारीख – ०५.१२.२०२०<br>निकाल तारीख – ३१.०७.२०२६<br>**कालावधी – वर्षे महिने दिवस**<br>**०५ ०७ २६** |

## २रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) माढा, यांचे न्यायालयात
## ( पिठासीन अधिकारी अनय डी. कुलकर्णी)

नियमित दिवाणी दावा क्र. ११५३/२०२०
**निशाणी क्रमांक – ७७/अ**

१. **ऋषीकेश दादासाहेब सावंत (खोत),**
वय –१९ वर्षे, व्यवसाय – शिक्षण

२. **ज्योती दादासाहेब सावंत (खोत),**
वय –३८ वर्षे, व्यवसाय – घरकाम
दोघे रा. वडाचीवाडी (त.म.), ता. माढा, जि. सोलापूर. --- **वादी**

**विरुध्द**

१. **ग्रामपंचायत वडाचीवाडी (त.म),**
ग्रामपंचायत कार्यालय, वडाचीवाडी (त.म),
ता. माढा, जि. सोलापूर
(सदरची नोटीस प्रतिवादी नंबर २
ग्रामसेवक यांचेवर बजावणेत यावी.)

२. **ग्रामसेवक,**
ग्रामपंचायत कार्यालय, वडाचीवाडी (त.म),
ता. माढा, जि. सोलापूर

**३. सरपंच,**

ग्रामपंचायत कार्यालय, वडाचीवाडी (त.म),

ता. माढा, जि. सोलापूर **--- प्रतिवादी**

---

**विधीज्ञ – वादींतर्फे विधीज्ञ श्री. एम. ए. परबत**

**प्रतिवादी क्र. १ ते ३ तर्फे विधीज्ञ श्री. एस. एम. पिंजारी**

---

**:: न्यायनिर्णय ::**

(दिनांक ३१/०७/२०२६)

प्रस्तुतचा दावा निरंतर ताकीद मिळणेसाठी दाखल केला आहे.

**<u>दावा मिळकतीचे वर्णन–</u>**

०२) मौजे वडाचीवाडी (त.म.), ता. माढा जि. सोलापूर येथील शेतजमीन–

क. गट नं. १९१ पैकी पश्चिमेकडील पहिली पट्टी, एकूण क्षेत्रफळ ०० हेक्टर १७.७५ आर, अशी असुन ज्याची चतुःसिमा पुर्वेस– सदर गटापैकी प्रकाश रामचंद्र सावंत (खोत) यांचे मालकीचे क्षेत्र, पश्चिमेस– गावठाण व रस्ता, दक्षिणेस– गट नं. १९० व उत्तरेस– कुर्डूवाडी–माढा रस्ता

येणेप्रमाणे चतुःसिमेतील शेतजमीन आतील झाड, झुडूप, वृक्षापाषाण वगैरे तदंगभुत वस्तुसह (सदर मिळकतीस यापुढे सोयीसाठी "दावा मिळकत" असे संबोधले आहे.)

**<u>वादींचे थोडक्यात कथन–</u>**

०३) वादींचे कथन की, दावा मिळकत वादींचे मालकी व प्रत्यक्ष कब्जेवहिवाटीची आहे. दावा मिळकत वादी क्र. १ यांना त्याचे कौटुंबिक वाटपात वादीचे हिश्यास मिळालेली मिळकत असून वादीच्या नावाची नोंद सातबारा उता–यावर फेरफार क्र. ९६५ अन्वये झाली आहे. तेव्हापासून वादी दावा मिळकतीची मालकी हक्काने शांततामय कब्जेवहिवाट करत आहे व त्यापुर्वी वादी नं. १ चे वडील व पुर्वजांची दावा मिळकतीमध्ये मालकी हक्काने

शांततामय कब्जेवहिवाट होती. दावा मिळकतीचे उत्तर बाजूस कुर्डूवाडी–माढा रस्ता असून रस्त्यावरील पाणी वाहून जाण्यासाठी जमिनीपासून ब–याच उंचीचे गटात दावा मिळकत लगत बांधलेली आहे. सदर रस्त्यावरुन वादीचे दावा मिळकतीमध्ये जाणे–येणेसाठी पश्चिमेकडील रस्त्याशिवाय दुसरा कोणताही सोयीचा रस्ता नाही.

०४) वादींचे पुढील कथन की, प्रतिवादी क्र. १ ग्रामपंचायत असून प्रतिवादी क्र. २ ग्रामसेवक व प्रतिवादी क्र. ३ सरपंच आहेत. सदर प्रतिवादींचा दावा मिळकतीशी कसलाही हक्क व हितसंबंध नाही. परंतु, प्रतिवादी क्र. १ चे वापराकरिता प्रतिवादी क्र. २ व ३ वादींचे दावा मिळकतीमध्ये पश्चिम बाजूकडून बेकायदेशीरपणे अतिक्रमण करणेचा प्रयत्न करुन वादींचे शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत व अडथळा करु लागले आहेत. दिनांक २५/०९/२०२० रोजी वादी दावा मिळकतीमध्ये ज्वारी पिकाची पेरणी करीत असताना प्रतिवादी क्र. २ व ३ हे प्रतिवादी क्र. १ चे वतीने दावा मिळकतीमध्ये अनाधिकाराने व जबरदस्तीने घुसून, 'यापुढे आम्ही ही जमीन आम्ही वहिवाटणार आहोत तुला इथे जमीन वहिवाटू देणार नाही' असे म्हणून वादीचे दावा मिळकतीतील शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत घेऊन अडथळा निर्माण केला. त्यामुळे, वादींनी प्रस्तुतचा दावा दाखल करुन प्रतिवादींनी वादींचे दावा मिळकतीवरील शांततामय कब्जास हरकत व अडथळा करु नये असा निरंतर मनाई हुकूम मिळणेच्या अनुतोषासाठी दाखल केला आहे.

**<u>प्रतिवादींचे थोडक्यात कथन</u>** –

०५) प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी नि.क्र. १३ अन्वये दाव्याची लेखी कैफियत दाखल केली आहे. प्रतिवादींनी दावा मिळकतीच्या चतुःसिमा नाकारल्या आहेत. सदर प्रतिवादींनी वादींचे दावा मिळकतीवरील मालकी हक्क व कब्जाबाबतचे कथन तसेच प्रतिवादींनी वादीच्या ताब्यास हरकत व अडथळा केल्याचे कथन स्पष्टपणे नाकारले आहे. प्रतिवादींचे कथन की, दिनांक १६/११/२०२० रोजी ग्रामपंचायत बॉडी बरखास्त झाली असून दिनांक १७/११/२०२० पासून ग्रामपंचायतीचे संपूर्ण कामकाज प्रशासक पाहत आहेत. प्रतिवादी क्र. १ यांना ग्रामपंचायतीच्या संपूर्ण गावठाण क्षेत्राची सरकारी मोजणीकरिता महाराष्ट्र शासनाचा दिनांक २२/०२/२०१९ रोजी शासन निर्णय झालेला असून त्याप्रमाणे गटविकास अधिकारी पंचायत समिती, कुर्डूवाडी यांना दिनांक १०/०९/२०२० रोजी जावक क्र. ९२२ नुसार उपअधिक्षक भुमी अभिलेख, माढा

यांच्याकडून गावठाण मोजणीकरिता नोटीस पाठविण्यात आली होती. सदर नोटीसीप्रमाणे प्रतिवादी क्र. १ यांना मोजणीचेवेळी जागेवर वादविवाद होण्याची शक्यता असल्यामुळे उपअधिक्षक भुमी अभिलेख, माढा यांच्या कार्यालयाकडून पोलीस बंदोबस्ताची मागणी केलेली होती. प्रतिवादी क्र. १ यांनी पोलीस अधिक्षक, सोलापूर यांचे कार्यालयास पोलीस बंदोबस्त देण्याची विनंती केली होती.

०६) प्रतिवादींचे पुढील कथन की, सदर विनंतीवरुन पोलीस बंदोबस्तात गावठाणातील संपूर्ण क्षेत्राची मोजणी झालेली आहे. सदर मोजणीची नोटीस गावठाण लगत सर्व शेतजमीन धारकांना विधीवत बजावण्यात आली होती. प्रतिवादी क्र. १ यांचे गावठाणचे क्षेत्र कायद्याप्रमाणे उपअधिक्षक भुमी अभिलेख, माढा यांचे कार्यालयाकडून मोजणी झालेली असून हद्दीखुणा कायम करण्यात आलेल्या आहेत. सदर मोजणीमध्ये वादी यांचे शेतजमिनीचे पश्चिमेस व प्रतिवादी क्र. १ यांचे गावठाण क्षेत्राचे ० हे १६ आर क्षेत्रात वादींनी अतिक्रमण केल्याचे निष्पन्न झाले आहे. वादींनी सदर मोजणीबाबत खरी परिस्थिती दाव्यात नमूद केलेली नाही. प्रतिवादी क्र. १ यांचे मोजणीअंती अतिक्रमण केलेले क्षेत्र प्रतिवादीने घेऊ नये म्हणून वादींनी प्रस्तुतचा खोटया मजकूराचा खोटा दावा दाखल केला आहे असे कथन करुन दावा खारिज करण्यात यावा अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे.

०७) माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी नि.क्र. २१ वर दाव्याचे न्यायनिर्णयाप्रत येण्यासाठी इंग्रजी भाषेत मुद्दे निश्चीत केले आहेत. सदरचे मुद्दे मराठी भाषेत अनुवादीत करुन त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ. क्रं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादी दावा मिळकतीचे मालक व कब्जेदार आहेत असे वादींनी सिध्द केले आहे काय ?<br>(Whether plaintiffs prove that, they are lawful owner and possessor of suit property ? ) | होय |
| २. | प्रतिवादींनी वादींच्या दावा मिळकतीवरील कब्जास हरकत व अडथळा केला असे वादींनी सिध्द केले आहे काय?<br>(Whether plaintiffs prove obstruction at the hands of defendants over the suit property ?) | नाही |

| | | |
|---|---|---|
| ३. | वादी निरंतर मनाई हुकूम मिळणेच्या अनुताषास पात्र आहेत हे वादींनी सिध्द केले आहे काय ?<br>(Whether plaintiffs proves that, they are entitled for relief as prayed ?) | नाही |
| ४. | आदेश व हुकूमनामा ?<br>(What order and decree ?) | दावा खर्चासह नामंजूर करण्यात येतो. |

**कारणमिमांसा**

०८) वादींनी दावा सिध्द करणेकामी खालील नमूद साक्षीदार तपासले.

| अ. क्र. | वादीचे साक्षीदार | नि. क्र. |
|---|---|---|
| १. | वादी क्र. २ नामे ज्योती दादासाहेब सावंत(खोत) | ३१ |
| २. | वादी क्र. १ नामे ऋषीकेश दादासाहेब सावंत(खोत) | ४० |
| ३. | कल्याण दत्तु भराटे | ४६ |
| ४. | अनिल रामचंद्र तरटे | ४७ |

०९) वादींनी उपरोक्त तोंडी पुराव्याव्यतिरीक्त दावा सिध्द करण्यासाठी खालीलप्रमाणे कागदोपत्री पुराव्यावर भिस्त ठेवली आहे.

| अ. क्र. | कागदपत्राचे स्वरूप | नि. क्र. |
|---|---|---|
| १. | दावा मिळकताचा सातबारा उतारा | ३५ |
| २. | पीकपावती दाखला | ३६ |
| ३. | फेरफार उतारा क्रमांक ९६५ | ३७ |
| ३. | दावा मिळकतीचे छायाचित्रं | ४८ ते ५१ |
| ४. | छायाचित्र घेतलेबाबतची पावती | ५२ |

१०) वादींनी सदर तोंडी पुरावा व कागदोपत्री पुरावा सादर केल्यानंतर दिनांक २५/०६/२०२४ रोजी नि.क्र.५७ वर पुरसिस दाखल करुन पुरावा बंद केला आहे.

११) प्रतिवादींनी दावा सिध्द करणेकामी खालील नमूद साक्षीदार तपासले.

| अ. क्र. | प्रतिवादीचे साक्षीदार | नि. क्र. |
|---|---|---|
| १. | प्रतिवादी क्र. २ नामे शिवाजी नागनाथ लोकरे | ६१ |

१२) प्रतिवादींतर्फे वरील तोंडी पुराव्याव्यतिरिक्त खालील कागदोपत्री पुराव्यांवर भिस्त ठेवली आहे.

| अ. क्र. | कागदपत्राचे स्वरूप | नि. क्र. |
|---|---|---|
| १. | मिळकती मोजणीबाबतचा शासन निर्णय | ७० |
| २. | दावा मिळकतीचा सातबारा उता–याची प्रमाणित प्रत | ६७ |
| ३. | दावा मिळकतीबाबतचा फेरफार नोंद उता–याची प्रमाणित प्रत | ६८ |
| ४. | मोजणी नकाशा प्रत | ६९ |

१३) प्रतिवादींनी उपरोक्त तोंडी व कागदोपत्री पुरावा सादर केल्यानंतर दि. १३/०३/२०२६ रोजी नि.क्र. ७६ वर पुरसिस दाखल करुन पुरावा बंद केला.

१४) वादींचे सुविद्य विधीज्ञ श्री एम. ए. परबत व प्रतिवादी क्र. १ ते ३ तर्फे सुविद्य विधीज्ञ श्री. एस. एम. पिंजारी यांचा युक्तीवाद ऐकला. वादीतर्फे सुविद्य विधीज्ञांनी दाव्यातील कथनाप्रमाणे युक्तीवाद केला आहे. वादी दावा मिळकतीचे कायदेशीर कब्जेदार आहेत असे दाखल सातबारा उतारा (नि.क्र.३५), फेरफार उतारा क्र. ९६५ (नि.क्र. ६८) या कागदपत्रांवरुन सिध्द होत आहे. तसेच, वादी व वादीतर्फे तपासण्यात आलेला साक्षीदार यांचे साक्षीपुराव्यावरुन प्रतिवादींनी वादीचे दावा मिळकतीवरील कब्जास हरकत व अडथळा केला हे सिध्द होत आहे असे कथन करुन दावा डिक्री करण्याची विनंती केली आहे.

१५) प्रतिवादींचे सुविद्य विधीज्ञ यांनी प्रतिवादींनी वादीची मिळकत मौजे वडाचीवाडी या ग्रामपंचायत हद्दीत असून सदर ग्रामपंचायतीतील गावठाण क्षेत्राची शासन निर्णयाप्रमाणे मोजणी केली असता वादींचे गावठाण क्षेत्रावर अतिक्रमण असल्याचे दिसून

आले आहे. सदर मोजणी नकाशा (नि.क्र. ६९) अभिलेखावर दाखल केला आहे. प्रतिवादींनी वादींच्या कथनाप्रमाणे दावा मिळकतीस कधीही हरकत व अडथळा केला नाही. याउलट, वादींना अतिक्रमित क्षेत्राचा ताबा प्रतिवादीस द्यायला लागू नये यासाठी वादींनी खोटे कथन करुन प्रस्तुत दावा दाखल केला आहे. तसेच, गावठाण क्षेत्राची मोजणी झाली ही बाब न्यायालयापासून लपवली आहे. त्यामुळे, वादी मनाई हुकूम मागण्यास पात्र नाही असे कथन करुन दावा नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**<u>मुद्दा क्र. ०१ करीता</u>** –

**१. वादी दावा मिळकतीचे मालक व कब्जेदार आहेत असे वादींनी सिध्द केले आहे काय ?**

१६) वादींनी प्रस्तुतचा दावा हा वादी दावा मिळकतीचे मालक व कब्जेदार आहेत असे कथन करुन प्रतिवादींचा दावा मिळकतीशी काहीही संबंध नसताना प्रतिवादी वादींचे दावा मिळकतीवरील कब्जास हरकत व अडथळा करत आहेत असे कथन करुन निरंतर मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केला आहे. सदर अनुतोषाची विनंती विचारात घेता कायद्यातील स्थित्य तत्वानुसार वादींना प्रथम वादी दावा मिळकतीचे कायदेशीर मालक व कब्जेदार आहेत किंवा कसे हे शाबित करणे आवश्यक आहे. त्यामुळे, वादींनी सदर बाब सिध्द केली आहे किंवा कसे हे पाहणे क्रमप्राप्त ठरते.

**<u>वादी व प्रतिवादींचा पुरावा –</u>**

१७) वादी क्र. १ नामे ऋषीकेश दादासाहेब सावंत(खोत) व वादी क्र. २ नामे ज्योती दादासाहेब सावंत(खोत) यांनी दाखल केलेले पुरावा शपथपत्र (नि.क्र.४० व ३१) यामध्ये दाव्यातील कथनांचा पुनरोच्चार केलेला आहे. सदर दाव्यातील कथनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी सदर पुरावा शपथपत्रातील मजकूर या ठिकाणी नमूद करण्यात आलेला नाही. वादींनी पुरावा शपथपत्रात, ' दावा मिळकत वादींना कौटुंबिक वाटपात वादीच्या हिश्यास मिळालेली मिळकत आहे व वादीचे नाव सातबारा उता–यावर फेरफार क्र. ९६५ या नोंदी आधारे झालेली आहे. वादी तेव्हापासून दावा मिळकतीचे कब्जेदार असून वादी दावा मिळकतीत ज्वारीचे पीक घेत आहेत' असे स्पष्टपणे कथन केले आहे.

१८) कल्याण (वादी सा.क्र.३) यांचे दावा मिळकतीच्या नजीकच शेतजमीन आहे. सदर साक्षीदाराने वादीचे पुराव्यास सुसंगत अशी साक्ष दिली आहे. अनिल(वादी सा.क्र. ४)

यांनी पुरावाशपथपत्र सादर करुन वादीच्या विनंतीप्रमाणे त्यांनी दावा मिळकतीत जाऊन ज्वारी या उभ्या पिकाचे दिनांक १०/०१/२०२१ रोजी एकूण चार छायाचित्र घेतले असून छायाचित्रे व पावती अभिलेखावर दाखल केली आहेत असे कथन केले आहे. वादींनी सदर तोंडी पुराव्याव्यतिरिक्त उपरोक्त नमूद कागदोपत्री पुराव्यावर भिस्त ठेवली असल्याचे दिसून येते. प्रतिवादींतर्फे वादी व वादींचे साक्षीदारांचा सविस्तर उलटतपास घेण्यात आला आहे.

१९) प्रतिवादींतर्फे प्रतिवादी क्र. २ यांचे पुरावाशपथपत्र (नि.क्र. ६१) अन्वये दाखल केले आहे. सदर प्रतिवादींनी लेखीकैफियतीमधील कथनांचा पुनरोच्चार करुन उपरोक्त नमूद कागदोपत्री पुराव्यावर भिस्त ठेवली आहे. वादींतर्फे सदर प्रतिवादीचा सविस्तर उलटतपास घेण्यात आला आहे.

**<u>पुराव्याचे विवेचन–</u>**

२०) वादींनी कथनापुष्टयर्थ दाखल केलेल्या दावा मिळकतीचा सातबारा उतारा (नि.क्र.३५), फेरफार उतारा क्र. ९६५(नि.क्र.३७) या कागदपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता वादींचे कथनाप्रमाणे वादींना नियमित दिवाणी दावा क्र. ६४४/२०२० या दाव्यातील तडजोड हुकूमनाम्याद्वारे दावा मिळकत वादी क्र. १ अल्पवयीन असताना त्याचे हिश्यास देण्यात आली आहे अशी नोंद फेरफार उतारा क्र. ९६५ या अभिलेखावर घेण्यात आली असल्याचे दिसून येते. सदर नोंदी आधारे दावा मिळकत सातबारा उता–यावर वादींचे नावाची नोंद झाली असल्याचे दिसून येते. तसेच, वादींनी दावा मिळकतीवर त्यांचा ताबा आहे या कथनापुष्टयर्थ पीकपावती दाखला (नि.क्र.३६) दावा मिळकतीचे छायाचित्र (नि.क्र.४८ ते ५१) सादर केले आहेत. सदर पीकपावतीचे अवलोकन केले असता, वादीने दावा मिळकतीत सन २०१९–२० या कालावधीत ज्वारीचे पीक घेतले होते हे दिसून येते. तसेच, अनिल (सा.क्र.३) यांनी दावा मिळकतीचे छायाचित्र घेतले होते असे पुराव्यात सांगितले आहे. सदर त्यांनी घेतलेले छायाचित्र (नि.क्र.४८ ते ५१) याचे अवलोकन केले असता, दावा मिळकतीत ज्वारीचे पीक असलेबाबत दुजोरा मिळत असल्याचे दिसून येते. सदर कागदपत्रांवरुन वादीचे कथनानुसार दावा मिळकतीत वादीचा ताबा असून वादीने ज्वारीच्या पिकाची पेरणी केली होती हे स्पष्ट होते.

२१) प्रतिवादींनी लेखीकैफियतीमध्ये सदर वादीचा दावा मिळकतीवरील मालकी हक्क व ताबा नाकारला आहे. परंतु, प्रतिवादींनी दावा मिळकत ही त्यांचे मालकीची आहे व

त्यावर प्रतिवादींचा ताबा आहे याबाबत कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही. याउलट, प्रतिवादी क्र. २ यांचे साक्षीपुराव्याचे अवलोकन केले असता, त्यांनी उलटतपासामध्ये दावा मिळकत वादी क्र. १ यांना वडिलार्जित दिनांक १३/०८/२०२० रोजी वाटपातून मिळालेली आहे. सदर मिळकतीमध्ये वादींची पुर्वापार वहिवाट असून दावा मिळकतीच्या मालकी हक्काबाबत प्रतिवादींचा वाद नाही असे स्पष्टपणे मान्य केले असल्याचे दिसून येते. त्यामुळे, अभिलेखावरील दाखल कागदपत्रांवरुन वादींचा दावा मिळकतीवर मालकी हक्क व ताबा असल्याचे दिसून येते, तसेच प्रतिवादी क्र. २ यांनी उलटतपासामध्ये सदर बाब मान्य केली असल्याने वादींचा दावा मिळकतीवर मालकी हक्क आणि ताबा असल्याचे सिध्द होत आहे. सबब, मुद्दा क्र. १ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवण्यात येते.

<u>मुद्दा क्र. २ व ३ करिता –</u>

**२. प्रतिवादींनी वादींच्या दावा मिळकतीवरील कब्जास हरकत व अडथळा केला असे वादींनी सिध्द केले आहे काय ?**

**३. वादी निरंतर मनाई हुकूम मिळणेच्या अनुताषास पात्र आहेत हे वादींनी सिध्द केले आहे काय ?**

२२) मुद्दा क्र. २ व ३ एकमेकांशी संलग्नीत असल्याने एकत्रित विचारात घेतले आहेत.

२३) वादींनी प्रतिवादी क्र. २ व ३ हे अनाधिकाराने व जबरदस्तीने दावा मिळकतीत घुसून वादींचे दावा मिळकतीवरील कब्जास हरकत व अडथळा केला असे कथन करुन वादींनी प्रतिवादींविरुध्द निरंतर मनाई हुकूम मिळणेची विनंती केली आहे. वादींनी सदर निरंतर मनाई हुकूमाची विनंती विशिष्ट मदत कायदा, १९६३ (स्पेसिफिक रिलिफ ॲक्ट, १९६३) मधील कलम ३८ मधील तरतूदीनुसार केली असल्याचे दिसून येते. सदर कायद्यातील कलम ४१ (ए) ते (जे) नुसार निरंतर मनाई हुकूमाची विनंती फेटाळण्यात येणेबाबतची सुध्दा तरतूद आहे. त्यामुळे, मनाई हुकूम मिळणेसाठी केवळ वादींचा दावा मिळकतीवर कायदेशीर कब्जा असणे पुरेसे नसून वादींनी संशयाच्या पलीकडे जाऊन प्रतिवादींनी वादींच्या ताब्यास हरकत व अडथळा केला हे सिध्द केले आहे किंवा कसे, तसेच वादीच्या सदर विनंतीस विशिष्ट मदत कायदा, १९६३ चे कलम ४१(ए) ते (जे) या तरतुदींची बाधा येते किंवा कसे हे पाहणे क्रमप्राप्त ठरते.

२४) वादींनी दिनांक २५/०९/२०२० रोजी वादी दावा मिळकतीमध्ये ज्वारी पिकाची पेरणी करत असताना प्रतिवादी क्र. २ व ३ हे अनाधिकाराने व जबरदस्तीने दावा मिळकतीत घुसून वादींना आता तुला इथे जमीन वहिवाटू देणार नाही असे म्हणून हरकत व अडथळा केला असे कथन केले आहे. वादींचे सदर कथनास कल्याण (वादी सा.क्र. ३) यांनी पुरावा शपथपत्र सादर करुन दुजोरा दिला आहे. परंतु, प्रतिवादींनी सदरचे कथन नाकारले आहे. वादींनी प्रतिवादी त्यांचे मिळकतीत किती वाजता आले, प्रतिवादी क्र. २ व ३ यांची नावे व प्रतिवादी कशाच्या आधारे वादींना ते जमीन वहिवाटणार आहेत असे म्हणाले याबाबत स्पष्टपणे कथन करणे आवश्यक होते. परंतु, वादींनी प्रतिवादी दावा मिळकतीत कथित घटनेदिवशी कोण किती वाजता आले, प्रतिवादी क्र. २ व ३ यांची नावे काय होती याबाबत उहापोह केला नाही. वादी क्र. २ चे उलटतपासात सदर वादीला प्रतिवादींविरुध्द सदर अडथळयाबाबत पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली होती काय याबाबत प्रश्न विचारण्यात आला असल्याचे दिसून येते. वादी क्र. २ ने प्रतिवादीविरुध्द पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली होती व सदर फिर्यादीची प्रत अभिलेखावर दाख करण्यास तयार आहे असे सांगितले आहे. पंरतु, वादींनी सदर फिर्याद प्रत अभिलेखावर दाखल केली नाही. तसेच, दाव्यामध्ये फिर्याद दिलोबाबतचा उहापोह केला नाही. यावरुन, वादींचे सदर अडथळयाबाबतचे कथनास कागदोपत्री पुराव्याचा दुजोरा मिळाला नाही, त्यामुळे सदरचे कथन मोघम स्वरुपाचे असल्याचे दिसून येते.

२५) प्रतिवादींनी प्रतिवादी क्र. १ या ग्रामपंचायतीच्या संपूर्ण गावठाण क्षेत्राची सरकारी मोजणीकरिता महाराष्ट्र शासनाचा दिनांक २२/०२/२०१९ रोजी शासन निर्णय झाला आहे. सदर शासन निर्णयाप्रमाणे गटविकास अधिकारी पंचायत समिती, कुर्डूवाडी यांना दिनांक १०/०९/२०२० रोजी उपअधिक्षक भुमी अभिलेख, माढा यांचे कार्यालयाकडून मोजणी नोटीस पाठवण्यात आली होती व सदर मोजणीमध्ये वादीचे गावठाण क्षेत्राचे पुर्वेस ०० हे १६ आर क्षेत्राचे अतिक्रमण असल्याचे निष्पन्न झाले. सदर अतिक्रमीत क्षेत्र द्यायला लागू नये म्हणून वादीने प्रस्तुत दावा दाखल केला आहे असा बचाव घेतला आहे.

२६) प्रतिवादीने सदर बचावाप्रित्यर्थ दाखल केलेल्या शासन निर्णय (नि.क्र.७०) याचे अवलोकन केले असता प्रतिवादीचे कथनाप्रमाणे गावठाण मोजणीबाबत शासन निर्णय झाला असल्याचे दिसून येते. प्रतिवादींनी गावठाण क्षेत्राची मोजणी झाली हे दर्शवण्यासाठी

मोजणी निकाशा (नि.क्र.६९) अभिलेखावर दाखल केला आहे. सदर मोजणी नकाशाचे अवलोकन केले असता, सदर शासन निर्णयाप्रमाणे मौजे वडाचीवाडी येथील गावठाण मिळकतीची दिनांक १४/०८/२०२० रोजी मोजणी होऊन दिनांक २५/०९/२०२० रोजी हद्दीखुणा निश्चित करण्यात आल्या असल्याचे दिसून येते. सदर मोजणी नकाशात मोजणीवेळी दाखवलेल्या हद्दीखुणा व अभिलेखावरील हद्दीखुणा यामध्ये गट क्र. १९१ चे म्हणजेच वादीचे अतिक्रमीत क्षेत्र असल्याचे दिसून येते. त्यामुळे, प्रतिवादींचे कथनास सदर कागदोपत्री पुराव्याचा दुजोरा मिळत असल्याचे दिसून येते.

२७) प्रतिवादींतर्फे वादींना उलटतपासात सदर शासन निर्णय (नि.क्र.७०) व गावठाण मिळकतीची मोजणी, मोजणी नकाशाप्रमाणे अतिक्रमण याबाबत प्रश्न विचारण्यात आले. वादी क्र. १ यांनी मोजणीबाबत काही माहिती नाही असे सांगितले आहे. वादी क्र. २ यांनी त्यांचे उलटतपासात सुरुवातीला, "महाराष्ट्र शासन निर्णय दिनांक २२/०२/२०१९ नुसार गटविकास अधिकारी यांनी मोजणी अधिकारी माढा गावठाणची मोजणी करणेबाबत कळवले व त्यानुसार मोजणी अधिकारी यांनी माढा गावठाणाची मोजणी केली किंवा कसे याची माहिती नाही असे सांगितले आहे. परंतु, त्यानंतर वादीने सदर मोजणीविरुध्द माढा येथील वरिष्ठ न्यायालयात दाद मागितली आहे तसेच वडाचीवाडी ग्रामपंचायत यांना मोजणी मान्य नसल्याबाबत वकिलांमार्फत नोटीस दिली होती असे मान्य केले आहे. सदर उलटतपासावरुन वादींना शासन निर्णयानुसार गावठाण हद्दीची मोजणी झाली हे मान्य व माहिती असताना सदर बाब वादींनी दाव्यात लपवली व साक्ष देतेवेळी उलटतपास त्याबाबत काही माहिती नाही असे उत्तर देऊन दावा मिळकत ग्रामपंचायत हद्दीतील गावठाण क्षेत्र मोजणी बाबतचे सत्य न्यायालयापासून लपवण्याचा प्रयत्न केला असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे, वादी स्वच्छ हाताने न्यायालयात आले नसल्याचे स्पष्ट होते.

२८) प्रतिवादींनी मौजे वडाचीवाडी येथील गावठाण मोजणीमध्ये वादींनी गावठाण क्षेत्रात ०० हे १६ आर क्षेत्राचे अतिक्रमण केले आहे असे कथन केले आहे. सदरचे कथन वादींनी उलटतपासात नाकारले आहे. परंतु, वादी क्र. २ यांनी उलटतपासात सदर मोजणी वादींना मान्य नसलेबाबत माढा न्यायालयात दावा दाखल केला आहे व प्रतिवादींना नोटीस पाठवली असे सांगितले आहे. सदर कथनांच्या अनुषंगाने याठिकाणी नमूद करणे आवश्यक आहे की, कोणतीही व्यक्ती जमिनीची शासकीय मोजणी विनाकारण दावा दाखल करुन

न्यायालयात आव्हानित करणार नाही. वादीने सदर मोजणी दावा दाखल करुन कोणत्या कारणासाठी आव्हानित केली याची स्पष्टीकरण देणे आवश्यक होते. परंतु, वादीने सदर स्पष्टीकरण दिले नाही. त्यामुळे, वादींनी प्रतिवादींच्या कथनानुसार गावठाण हद्दीत अतिक्रमण केले असलेबाबत भारतीय पुरावा कायदा कलम ११४ अन्वये वादींविरुध्द प्रतिकुल अनुमान काढला जाऊ शकतो. तसेच, सदर मोजणीमध्ये वादीकडे अतिक्रमीत क्षेत्र मोजणी नकाशा आधारे दिसून येत असल्याने वादींनी सदर मोजणी आव्हानित केली असल्याची शक्यता नाकारता येत नाही असा प्रतिकुल अनुमान काढण्यासाठी वादींचे वर्तन पुरेसे असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे, वादींनी गावठाण क्षेत्राची मोजणी दावा दाखल करुन आव्हानित केली असल्याचे मान्य केल्याने वादींचे सदर वर्तनावरुन प्रतिवादींचे वादींनी गावठाण क्षेत्रात अतिक्रमण केले या कथनास दुजोरा मिळत असल्याचे दिसून येत आहे.

२९) विशिष्ट मदत कायदा कलम ४१(बी) व (आय) या तरतुदींचे अवलोकन केले असता, वादी प्रतिवादींना कायदेशीर तरतुदींचा अवलंब करणेकामी प्रतिबंध करणेसाठी व वादीचे वर्तन न्यायालयाचे सहाय्य मिळणेयोग्य नसेल तर वादी मनाई हुकूम मिळणेस पात्र नसून मनाई हुकूम मिळणेची विनंती फेटाळण्याची तरतुद आहे असे दिसून येते. वादींनी दावा मिळकत असलेल्या मौजे वडाचीवाडी येथील गावठाण क्षेत्र मोजणीची माहिती दाव्यात लपवली व मोजणी आव्हानित केल्याने वादींचे अतिक्रमीत क्षेत्राचा ताबा प्रतिवादीने दावा दाखल करुन घेऊ नये यासाठी वाईट हेतूने अडथळयाबाबतचे मोघम कथन करुन प्रस्तुत दावा दाखल केला असल्याचे निदर्शनास येत आहे. तसेच, वादींनी गावठाण क्षेत्र मोजणीबाबत माहिती असताना दाव्यात कथन केले नाही. तसेच, उलटतपासात मोजणीबाबत माहिती नाही अशी उत्तरे देऊन सदर मोजणी झालेबाबतचे सत्य न्यायालयापासून लपवले आहे असे उपरोक्त पुराव्याचे विवेचनावरुन निदर्शनास आले आहे. त्यामुळे, वादीचे अडथळयाबाबतचे मोघम कथन व वादीचे सदर वर्तनावरुन वादी मनाई हुकूम मिळणेकामी न्यायालयाचे सहाय्य मिळणेस पात्र नसल्याचे दिसून येते. त्यामुळे, कलम ४१(बी) व (आय) विशिष्ट मदत कायदा, १९६३ या तरतुदी आधारे वादी प्रतिवादींविरुध्द मनाई हुकूम मिळणेच्या अनुतोषास पात्र नाही असे सिध्द होते. सबब, मुद्दा क्र. २ व ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवण्यात येतात.

**<u>मुद्दा क्र. ४ करिता–</u>**

३०) मुद्दे क्र. २ व ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविल्यामुळे प्रस्तुत दावा खर्चासह नामंजूर होणेस पात्र असल्याचे दिसून येते. सबब, पुढीलप्रमाणे आदेश–

**<u>आदेश</u>**

**१.** दावा खर्चासह नामंजूर करण्यात येतो.

**२.** येणेप्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा.

(सदरचा न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला)

ANAY DNYANESH KULKARNI

Digitally signed by ANAY DNYANESH KULKARNI
Date: 2026.07.31 14:58:34 +0530

दिनांक – ३१/०७/२०२६

(**अनय डी. कुलकर्णी**)

२रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,माढा

| **CERTIFICATE** | | |
|---|---|---|
| I affirm that, the contents of this P.D.F. file Order/Judgment is same word to word, as per the original order/judgment. | | |
| Name of Stenographer | : | M.P.Dixit Grade-3 |
| Court Name | : | Shri. A. D. Kulkarni<br>2nd Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Madha. |
| Order/Judgment signed by the Presiding Officer on | : | 31/07/2026 |
| Order/Judgment uploaded on | : | 31/07/2026 |